सकाळ

सकाळ | सातारा

सातारा, बुधवार, ११ मे २०२२

TODAY

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800



कोरेगाव : डी. पी. भोसले कॉलेजमध्ये डॉ. विजय वाडते यांचा सत्कार करताना डॉ. शिवलिंग मेनकुदळे. त्यावेळी डॉ. विजय सावंत आदी.

# गुणवंत विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांना मिळते समाधान

## डॉ. मेनकुदळे; कोरेगावात डॉ. विजय वाडतेंचा सत्कार

**सातारा, ता. १० :** गुणवंत विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांचे समाधान समावलेले असते. हीच भावना ठेवून रयत सिक्षण संस्थेत ३६ वर्षे ज्ञानदान करणारे डॉ. विजय वाडते यांच्यासारखे शिक्षक हे संस्थेचे वैभव आहे, असे मत संस्थेचे ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी व्यक्त केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय वाडते यांचा सेवानिवृत्तीनिमित्त पत्नी माधुरी वाडतेंसह सत्कार झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते. कार्यक्रमास डॉ. गोरख सांगळे, उपप्राचार्य एस. ए. पाटील व डॉ. एस. एस. पवार, प्र. एस. एन. कोळेकर उपस्थित होते. यावेळी प्राचार्य सांगळे, प्राचार्य डॉ. सावंत यांनी डॉ. वाडतेंच्या कार्याचा गौरव केला. प्रा. एस. ए. पाटील, प्रा. आर. बी. पवार, प्रा. डी. बी. पवार, प्रा. व्ही. एन. बनकर, डॉ. डी. जी. गाताडे, डॉ. प्राची वाडते, डॉ. अजय वाडते आदींची भाषणे झाली. डॉ. जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. देवानंद सोनटक्के यांनी आभार मानले. प्रा. एस. के. उबाळे यांनी सूत्रसंचालन केले.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव